सन २०१७ च्या डिसेंबर अधिवेशनात पूरवणी मागणीद्वारे मंजूर निधीपैकी ९०% निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्यूएलपी ११.१७/प्र.क्र.२७९/फ-१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०३ मार्च, २०१८.

__वाचा :-__

१. वित्त विभाग परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.०४.२०१७.
२. वित्त विभाग परिपत्रक शासन पनरपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३०.०६.२०१७.
३. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०५१७/ प्र.क्र.१५३/फ-१ दिनांक :- ३१.०५. २०१७.
४. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक :- पूरक-२०१७/प्र.क्र.३३५/अर्थ-३, दिनांक २९.१२.२०१७.
५. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक :- पूरक-२०१७/प्र.क्र.२२८/ब-१, दिनांक ३०.१२.२०१७.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर, यांचे पत्र क्रमांक :- कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.३३/१८६१/१७-१८, दिनांक :- ०५.०१.२०१८.
७. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६.०२.२०१८

__प्रस्तावना :-__

राज्यस्तरीय योजनेतंर्गत सन २०१७-१८ करीता हक्क व विशेषाधिकार निर्धारित करणे-राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन या योजनेकरीता (२४०६-२२४१) या लेखाशिर्षांतर्गत रुपये १५००.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आला होता. सन २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात हक्क व विशेषाधिकार निर्धारित करणे-राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन या योजनेकरीता (२४०६-२२४१) या लेखाशिर्षांतर्गत अतिरीक्त रु. ८३३३.०० लक्ष निधी पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आला आहे.. सबब या योजनांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु. ९८३३.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

२. सन २०१७-१८ करीता सुधारीत अंदाज निश्चित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर हक्क व विशेषाधिकार निर्धारित करणे-राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन या योजनेकरीता (२४०६-२२४१) या लेखाशिर्षांतर्गत रु. ९८३३.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत

३. अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर हक्क व विशेषाधिकार निर्धारित करणे-राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन या योजनेकरीता (२४०६-२२४१) लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध रु. ९८३३.०० लक्ष निधीपैकी संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये रु. १२००.०० लक्ष वितरीत निधी वजा जाता संदर्भ क्रमांक ७ वरील वित्त विभागाचे परिपत्रकानुसार महसूल लेख्यातील अनिवार्य खार्चाच्या बाबीवर अर्थसंकल्पीत निधीच्या ९०% च्या मर्यादेत रु. ७६४९.७० लक्ष निधी वितरीत करणे अपेक्षित आहे.

शासन निर्णय :-

सबब उपरोक्त शासन निर्णयान्वये हक्क व विशेषाधिकार निर्धारित करणे-राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन या योजनेकरीता (२४०६-२२४१) लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेल्या निधीच्या मार्यदेत रु. ७६४९.७० लक्ष निधी खर्च करण्यास खालील अटींवर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अटी :-

I. प्रस्तावीत खर्च:- लेखाशिर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०२ पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीव संरक्षण (००) (११) हक्क व विशेषाधिकार निर्धारीत करणे-राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन (राज्य) (२४०६-२२४१) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध होणा-या अनुदानातून खर्च करण्यात यावा.

II. योजनांतर्गत प्रस्तावीत कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच सदर कार्यबाबींवर निधी खर्ची टाकण्यात यावा.

III. वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

IV. सदरच्या खर्चाच्या अनुषंगाने आवश्यक असलेले लेखे व्यवस्थित/अचूक ठेवण्याबाबत दक्षता घ्यावी.

V. कार्यबाबींमध्ये खरेदीचा समावेश असल्यास शासनाने विहित केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करण्यात यावी.

VI. अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने तथा अन्य वन प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या कुटुंबांचे पुनर्वसनासाठी निर्गमित शासन निर्णय क्रमांक : डब्ल्युएलपी-१०१२/प्र.क्र.१२२/फ-१, दिनांक ०३.११.२०१२, क्रमांक :- डब्ल्युएलपी/०७१४/प्र.क्र.१६७/फ-१, दि.१२/१०/२०१५ व क्रमांक डब्ल्यूएलपी क्र ०४१७/ प्र.क्र. १०७/फ-१ दिनांक १०.०१.२०१८ चे शासन निर्णया प्रमाणे पुनर्वसन प्रक्रिया करण्यात यावी.

VII. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे व वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.०४.२०१७, परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३०.०६.२०१७ , परिपत्रक क्रमांक :- पूरक-२०१७/प्र.क्र.३३५/अर्थ-३, दिनांक २९.१२.२०१७ व परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६.०२.२०१८ च्या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- पूरक-२०१७/प्र.क्र.३३५/अर्थ-३, दिनांक २९.१२.२०१७ व महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक :- पूरक-२०१७/प्र.क्र.२२८/ब-१, दिनांक ३०.१२.२०१७, नियोजन विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक :-२२६ दिनांक :- २०.०१.२०१८व वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ दिनांक :- २६.०२.२०१८ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०३१७०९४६६३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2018.03.03 16:49:01 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति :

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई.
५. मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.
६. मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर.
७. मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर.
८. महालेखापाल १ व २ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
९. निवड नस्ती, फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई ३२.

****